'26 SEP 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महोत्सवातून गुणवंत घडविण्याचे काम

## आमदार आबिटकर : गारगोटीत शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

गारगोटी,ता. २५ : 'युवा महोत्सव ही युवकांसाठी पर्वणी असून, यातून सुप्त व कलागुणांना वाव मिळतो. महोत्सवाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे काम होते,' असे प्रतिपादन आमदार प्रकाश आबिटकर यांनी केले.

येथील मौनी विद्यापीठात कर्मवीर हिरे महाविद्यालयातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या ३७ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमावेळी ते बोलत होते. विश्वस्त शालिनी देसाई अध्यक्षस्थानी होत्या. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही.. गुरव म्हणाले, ''युवक महोत्सव हा कला क्षेत्रातील महत्त्वाचा सोहळा आहे. विद्यापीठ व महाविद्यालये मनुष्यबळ तयार करण्याचे काम करतात. युवकांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक विकास आवश्यक असतो. यात युवक महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावितो.'' स्वागताध्यक्ष संचालक डॉ. आर. डी. बेलेकर यांनी स्वागत केले.



गारगोटी : मौनी विद्यापीठात सोमवारी मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार प्रकाश आबिटकर. शेजारी डॉ. जी. एस. म्हांगोरे, डॉ. एम. एल. होनगेकर, डॉ. आर. डी. बेलेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, शालिनी देसाई, सरिता चिले, रेश्मा देसाई, राहुल देसाई आदी.




प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी प्रास्ताविक केले. युवक नेते राहुल देसाई, मौनी विद्यापीठाचे सदस्य अलकेश कांदळकर, विश्वनाथ कुंभार, जि. प. सदस्य रेश्मा देसाई, प्रा. दीपक खोत, सरपंच सरिता चिले, उपसरपंच अरुण शिंदे, भाऊसाहेब देसाई, प्रा. शिवाजीराव चोरगे, प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर, डॉ. एम. एल. होनगेकर, डॉ. भाग्यश्री जाधव, डॉ. टी. के. करेकट्टी, डॉ. टी. पी. शिंदे, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, प्रा. ए. जे. गोडसे आदी उपस्थित होते. डॉ. शहाजी वारके यांनी आभार मानले. प्रा. सौ. एम. एस. पोवार, प्रा. सौ. एम. एस. देसाई यांनी सूत्रसंचालन केले.



गारगोटी : येथील मौनी विद्यापीठात युवा महोत्सवात लोककला सादर करताना विद्यार्थिनी.

# लोककलेसह लोकवाद्य स्पर्धा लक्षवेधी

## मौनी विद्यापीठ गजबजले : तीन जिल्ह्यांतील दीड हजारांवर विद्यार्थी सहभागी

गारगोटी, ता. २५ : येथील मध्यवर्ती महोत्सवात आज पहिल्याच दिवशी लोकवाद्य, लोककला, शास्त्रीय गायन व तालवाद्यासह अनेक स्पर्धांनी चांगलीच रंगत आणली. कला व सांस्कृतिक बाज असलेला महोत्सव पाहण्यासाठी गर्दी झाली होती.

बासरी, शास्त्रीय गायनातील विविध राग, ढोलकीसह ढोल-ताशांच्या कडकडाटाने महोत्सवात रंगत आणली. ढोल-ताशांचा गजर, नृत्याचा नवा आविष्कार आणि रंगीबेरंगी रंगाची मांडणी करणारी रांगोळी, अशा ताल व नाद, सूर व रंगांच्या आविष्कारात महोत्सवाला थाटामाटात सुरवात झाली. मौनी विद्यापीठात तीन दिवस होणाऱ्या या मध्यवर्ती युवा महोत्सवात २९ कला प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सुमारे दीड हजारांवर विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत. रावसाहेब डॉ. व्ही. टी. पाटील या मुख्य व्यासपीठावर लोकवाद्यवृंद कार्यक्रमाने स्पर्धेचा प्रारंभ झाला. लोकवाद्य व लोककलेसह पथनाट्य आजच्या कार्यक्रमातील खास आकर्षण ठरले. दिवसभरात लोककला, एकांकिका, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, रांगोळी, कोलाज, पथनाट्य, मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा झाल्या.

26 SEP 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महोत्सवातून गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे काम

## आ. आबिटकर : युवक महोत्सवाचे उद्‌घाटन; सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील ८९ महाविद्यालयांचा सहभाग

**गारगोटी : प्रतिनिधी**

युवकांच्या सुप्त व कलागुणांना वाव देण्यासाठी युवा महोत्सव ही एक पर्वणी आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे काम होते, असे प्रतिपादन आमदार प्रकाश आबिटकर यांनी केले. येथील मौनी विद्यापीठात कर्मवीर हिरे महाविद्यालयातर्फे आयोजित शिवाजी विद्यापीठाच्या ३७ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या शानदार उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. विश्वस्त सौ. शालिनी देसाई अध्यक्षस्थानी होते. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे ८९ महाविद्यालयांतील स्पर्धक दाखल झाले आहेत. यामुळे मौनी विद्यापीठ परिसर गर्दीने फुलून गेला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, युवक महोत्सव हा कला क्षेत्रातील एक महत्त्वाचा सोहळा आहे. विद्यापीठ व महाविद्यालये मनुष्यबळ तयार करण्याचे काम करतात. यामुळे युवकांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक विकास आवश्यक असतो. यात युवक महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावितो.




**गारगोटी : मौनी विद्यापीठात आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना आमदार प्रकाश आबिटकर. शेजारी डॉ. जी. एस. म्हांगोरे, डॉ. एम. एल. होनगेकर, डॉ. आर. डी. बेलेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, विश्वस्त सौ. शालिनी देसाई, सौ. सरिता चिले, रेश्मा देसाई, राहुल देसाई, अलकेश कांदळकर आदी.**

विश्वस्त शालिनी देसाई म्हणाल्या, युवक महोत्सव कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले आविष्कार दाखविण्यासाठी व्यासपीठ मिळत असून अशा कार्यक्रमातून विद्यार्थी घडतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला चालना मिळते.

स्वागताध्यक्ष संचालक डॉ. आर. डी. बेलेकर यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी प्रास्ताविक केले. युवक नेते राहुल देसाई, मौनी विद्यापीठाचे सदस्य अलकेश कांदळकर, विश्वनाथ कुंभार, जिल्हा परिषद सदस्य रेश्मा देसाई, प्रा. दीपक खोत, सरपंच सौ. सरिता चिले, उपसरपंच अरुण शिंदे, माजी चेअरमन भाऊसो देसाई, प्रा. शिवाजीराव चोरगे, प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर, डॉ. एम. एल. होनगेकर, डॉ. भाग्यश्री जाधव, डॉ. टी. के. करेकट्टी, डॉ. टी पी शिंदे, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, प्रा. ए. जे. गोडसे, डॉ.संजय देसाई, सागर व्हनाळकर, मृणाल कांबळे आदी उपस्थित होते. डॉ. शहाजी वारके यांनी आभार मानले. प्रा. सौ. एम. एस. पोवार, प्रा. सौ. एम. एस. देसाई यांनी सूत्रसंचालन केले.



**गारगोटी : वाद्यवृंद स्पर्धेतील एक क्षण.** **(छाया : रविराज पाटील)**

बासरी, शास्त्रीय गायनांचा मंजूळ गायनातील विविध राग, ढोलकीसह ढोल-ताशांचा कडकडाटाने महोत्सवात पहिल्याच दिवशी चांगलीच रंगत आणली. ढोल-ताशांचा गजर, नृत्यांचा नवा आविष्कार आणि रंगीबेरंगी रंगाची मांडणी करणारी रांगोळी, अशा ताल व नाद, सूर व रंगांच्या आविष्कारात महोत्सव थाटामाटात सुरुवात झाली. मौनी विद्यापीठात पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या मध्यवर्ती युवा महोत्सवात २९ कला प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील सुमारे दीड हजारांवर विद्यार्थी यात सहभागी झाले असून ती आपली कला सादर करणार आहेत. विविध कलांचा आविष्कार पाहण्यासाठी मौनी विद्यापीठाचा परिसर गर्दीने फुलला आहे. मुख्य स्टेजवर लोकवाद्य वृंद कार्यक्रमाने स्पर्धेचा प्रारंभ झाला. दिवसभरात लोककला, एकांकिका, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, रांगोळी, कोलाज, पथनाट्य, मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा घेण्यात आल्या.

26 SEP 2017 Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK's central youth festival begins

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Central youth festival of Shivaji University, Kolhapur (SUK) began on Monday.

The fest is being held at Karmaveer Hire 'Arts, Commerce and Science College in Gargoti, around 50km away from the city. The event will continue till September 27.

R V Gurav, professor department of Botany and student welfare officer, told **TOI** that around 100 teams are participating in the central youth festival which includes cultural activities like classical singing, street play, one act play etc.

File Photo



Students from over 200 colleges across three districts are participating in the youth festival in 26 categories

Gurav said students from over 200 colleges are participating in the youth festival, in 26 categories.

"The winners, as well as runner-ups from the central youth festival, will have a chance to represent the Shivaji University at the inter-university youth festival Indradhanush later in November," Gurav said.

"We have made sure that not only the winning side, but also the talent can be assessed throuhout the festival. Hence, special instructions have been given to the jury to spot exceptional participants. Auditions have been scheduled on September 28 and 29," he added.

He further added that a team of 40 students, winners in their respective categories, will represent the SUK team in the inter-university festival at Parbhani in the first week of November.

'26 SEP 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवातून गुणवंत घडवण्याचे काम

## - आ. प्रकाश आबिटकर

**गारगोटी / प्रतिनिधी :** युवकांच्या सुप्त व कलागुणांना वाव देण्यासाठी युवा महोत्सव ही एक पर्वणी आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी घडवण्याचे काम होते, असे प्रतिपादन आमदार प्रकाश आबिटकर यांनी केले.



गारगोटी : युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आ. प्रकाश आबिटकर. शेजारी जी. एस. म्हांगोरे आदी.

येथील मौनी विद्यापीठात कर्मवीर हिरे महाविद्यालयातर्फे आयोजित शिवाजी विद्यापीठाच्या ३७ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या शानदार उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विश्वस्त शालिनी देसाई अध्यक्षस्थानी होत्या. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, युवक महोत्सव ▶▶ पान २ वर

# युवा महोत्सवातून गुणवंत घडवण्याचे काम

**(पान १ वरुन)** हा कला क्षेत्रातील एक महत्त्वाचा सोहळा आहे. विद्यापीठ व महाविद्यालये मनुष्यबळ तयार करण्याचे काम करतात. यामुळे युवकांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक विकास आवश्यक असतो. यात युवक महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावतो.

स्वागताध्यक्ष संचालक डॉ. आर. डी. बेलेकर यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी प्रास्ताविक केले. युवक नेते राहुल देसाई, मौनी विद्यापीठाचे सदस्य अलकेश कांदळकर, विश्वनाथ कुंभार, रेश्मा देसाई, प्रा. दीपक खोत, सरपंच सरिता चिले, उपसरपंच अरुण शिंदे, माजी चेअरमन भाऊसो देसाई, शिवाजीराव चोरगे, प्राचार्य भास्कर ताम्हणकर, एम. एल. होनगेकर, भाग्यश्री जाधव, टी. के. करेकट्टी, टी. पी. शिंदे, विनोद ठाकूर-देसाई, ए. जे. गोडसे आदी उपस्थित होते. शहाजी वारके यांनी आभार मानले. एम. एस. पोवार, एम. एस. देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

26 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकनृत्य स्पर्धेत 'आजरा' अव्वल




विभागीय युवा महोत्सवाच्या स्पर्धेतील एक क्षण.

**म. टा. वृत्तसेवा, आजरा**

ढोलकीचा कडकडाट, ढोल-ताशांचा गजर, हलगी-घुमक्याचं घुमणं, संबळ-दिमडीचा ठेका आणि या तालावर रंगलेली गीत, संगीत, नृत्य आणि अभिनयाच्या पेशकशीची जुगलबंदी चंदगडकरांनी आकंठ आस्वादली. पावसाची सातत्याने रिमझिम सुरू असतानाही कला-सांस्कृतिक सादरीकरणामध्ये कोठेही कसर न सोडलेल्या युवाजनांच्या उत्साहाचे हे उधाण आले होते, चंदगडच्या र. भा. माडखोलकर महाविद्यालयाच्या प्रांगणात. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ३७ व्या विभागीय युवा महोत्सवाचे. पहाटे तीन वाजेपर्यंत रंगलेल्या या स्पर्धेमध्ये अखेर प्रतिष्ठेच्या लोकनृत्य स्पर्धेमध्ये आजरा महाविद्यालयाने बाजी मारली. तर लोकवाद्यवृंदामध्ये विवेकानंद महाविद्यालयाची सरशी झाली.

नृत्य, संगीत, वाद्यवृंद, नाटिका, मूकनाट्य, वक्तृत्व आणि लोककलांच्या या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, विद्यार्थी मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अभिनेते विकास पाटील, धनंजय पाटील, अवधूत जोशी आदी मान्यवरांसह प्राचार्य डॉ. पी. आर. पाटील उपस्थितीत झाले. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य व्ही. आर. बांदीवडेकर होते. त्यानंतर मुख्य रंगमंचावर लोककलावाद्यवृंदाचे सादरीकरण जोरदार झाले. स्पर्धेतील विविध कलाप्रकार मुख्यरंगमंचासह प्रांगणातील विविध ठिकाणी मध्यरात्रीनंतरही रंगले होते.

साहित्य संस्कृती

**लोकवाद्यवृंदामध्ये विवेकानंदची बाजी**

या महोत्सवातील पहिली तीन यशस्वी महाविद्यालये पुढीलप्रमाणे: १) एकांकिका- आजरा महाविद्यालय, न्यू कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग २) लोकनृत्य- आजरा महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, ३) लोककला- शरद इन्स्टिट्यूट, यड्राव, डीकेटीई कॉलेज, इचलकरंजी, आजरा महाविद्यालय, ४) लोकवाद्यवृंद- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, आजरा महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर ५) लघुनाटिका- आक्कताई पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर ६) पथनाट्य- नाईट कॉलेज, इचलकरंजी, कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर, शिवशाहू महाविद्यालय, सरूड ७) मूकनाट्य-न्यू कॉलेज, कोल्हापूर, आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, राजर्षि शाहू कॉलेज, रूकडी, समूहगीत- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर ९) सुगम गायन- राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग १०) वादविवाद - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, दूधसागर महाविद्यालय, बिद्री, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज ११) मराठी वक्तृत्व- शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग, माडखोलकर कॉलेज, चंदगड, माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, वाठार, १२) हिंदी वक्तृत्व- कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, घाळी कॉलेज, गडहिंग्लज १३) इंग्रजी वक्तृत्व- डिकेटीई कॉलेज, इचलकरंजी, घाळी कॉलेज, गडहिंग्लज, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर.

26 SEP 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवकांच्या सुप्तगुणांसाठी युवा महोत्सव पर्वणी

## आमदार प्रकाश आबिटकर : गारगोटीत शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचे शानदार उद्घाटन




**गारगोटी : मौनी विद्यापीठात आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार प्रकाश आबिटकर. शेजारी डॉ. जी. एस. म्हांगोरे, डॉ. एम. एल. होनगेकर, डॉ. आर. डी. बेलेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, सौ. शालिनी देसाई, सौ. सरिता चिले, रेश्मा देसाई, राहुल देसाई, अलकेश कांदळकर आदी. (फोटो : गंगा डिजिटल)**

प्रतिनिधी
गारगोटी

युवकांच्या सुप्त व कलागुणांना वाव देण्यासाठी युवा महोत्सव ही एक पर्वणी आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे काम होते, असे प्रतिपादन आमदार प्रकाश आबिटकर यांनी केले.

येथील मौनी विद्यापीठात कर्मवीर हिरे महाविद्यालयातर्फे आयोजित शिवाजी विद्यापीठाच्या ३७ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विश्वस्त सौ. शालिनी देसाई अध्यक्षस्थानी होते.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, युवक महोत्सव हा कला क्षेत्रातील एक महत्वाचा सोहळा आहे. विद्यापीठ व महाविद्यालये मनुष्यबळ तयार करण्याचे काम करतात. यामुळे युवकांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक विकास आवश्यक असतो. यात युवक महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावितो. स्वागताध्यक्ष संचालक डॉ. आर. डी. बेलेकर यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी प्रास्ताविक केले.

युवक नेते राहुल देसाई, मौनी विद्यापीठाचे सदस्य अलकेश कांदळकर, विश्वनाथ कुंभार, रेश्मा देसाई, प्रा. दीपक खोत, सरपंच सरिता चिले, उपसरपंच अरूण शिंदे, माजी चेअरमन भाऊसो देसाई, प्रा. शिवाजीराव चोरगे, प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर, डॉ. एम. एल. होनगेकर, डॉ. भाग्यश्री जाधव, डॉ. टी. के. करेकट्टी, डॉ. टी पी शिंदे, डॉ. विनोद ठाकुर–देसाई, प्रा. ए. जे. गोडसे आदी उपस्थित होते. डॉ. शहाजी वारके यांनी आभार मानले. प्रा. सौ. एम. एस. पोवार, प्रा. सौ. एम. एस. देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

मौनी विद्यापीठात पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस चालणाऱ्या या मध्यवर्ती युवा महोत्सवात २९ कलाप्रकार सादर केले जाणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातील सुमारे २००० च्या वर विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. विविध कलांचा अविष्कार पाहण्यासाठी अवघे भुदरगड मौनी विद्यापिठाच्या क्रिडांगणावर अवतरले होते. प्रेक्षकांच्या अलोट गर्दीत रंगलेला या सोहळयाचे उद्घाटन ही शानदार झाले.

26 SEP 2017 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'बहाई अकादमीतर्फे प्रा. रूपा शहा यांचा सन्मान

**कोल्हापूर/ प्रतिनिधी :**
वैश्विक मानवी व नैतिक मूल्यांच्या शिक्षणासाठी मान्यताप्राप्त 'बहाई अकादमी'या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून प्रा. डॉ. रूपा शहा यांना 'रिसर्च गाईड ऑफ द बहाई अकादमी म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

बहाई अकादमीचे सातारा जिल्ह्यातील पाचगणी येथे केंद्र आहे. या केंद्राचा ३५ वा वर्धापनदिन साजरा झाला. भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जानकर, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डिसोझा तसेच बहाई अकादमी पाचगणीचे संचालक लेसन आझादी यांच्या प्रमुख उपस्थितीत यावेळी झालेल्या समारंभात प्रा. डॉ. रूपा शहा यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रीय छात्रसेनेच्या माध्यमातून छात्रसैनिकांमध्ये मानवी मूल्ये रुजविण्यासाठी व महिला सबलीकरणासाठी प्रा. डॉ. रूपा शहा यांनी सातत्याने अनेक उपक्रम राबवले होते.

याखेरीज दिलासा सामाजिक विश्वस्त संस्थेच्या माध्यमातूनही त्या मानवी व नैतिकमूल्यांच्या संवर्धनासाठी काम करीत आहेत. हे काम करीत असताना प्रा. डॉ. शहा यांनी बहाई अकादमीचे तीन प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले. छात्रसैनिकांसाठीही पाचगणीमध्ये कार्यशाळा घेतल्या.




**कोल्हापूर : बहाई अकादमीतर्फे प्रा. रूपा शहा यांना प्रशस्तिपत्र प्रदानप्रसंगी डॉ. राम ताकवले. सोबत डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. जानकर, डॉ. डी. टी. शिर्के व इतर.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2017
पुण्यनगरी

# पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठामध्ये त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामध्ये पंडित उपाध्याय यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. एन. सी. माळी, मोनिका खाचणे, गजानन साळुंखे यांच्यासह अधिकारी, प्रशासकीय सेवक, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.